ARTHA ( Commercial Weekly )
Poona 4

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः ” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १५ | पुणें, बुधवार तारीख १९ ऑगस्ट, १९५९ | अंक ३३

## विविध माहिती

**प्रवासी आकर्षित करण्यासाठी**—कुलू खोऱ्यांतील निसर्गरम्य ठिकाणांना जाणें हौशी प्रवाशांना सुलभ व्हावें म्हणून पंजाब सरकार दिल्ली-चंडीगढ-कुलूखोरें, अशी विमानांची वहातूक सुरू करणार आहे. येत्या महिन्याच्या १५ तारखेपासून ही वहातूक सुरू होईल. कुलू खोऱ्यांत जाण्याचा जमिनीवरील मार्ग फार अवघड आहे. हवाई वहातूक सुरू करण्यांत आली तर प्रवाशांपासून मिळणारें उत्पन्न वाढण्याची चांगलीच शक्यता आहे.

**पाकिस्तानचा दुसरा पंचवार्षिक कार्यक्रम**—पाकिस्तानच्या दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाचा आराखडा तयार करण्यांत येत असून तो बहुधा ह्या वर्षाच्या अखेरीस प्रसिद्ध करण्यांत येईल. कार्यक्रम प्रे. अयुबखान सत्ताधारी झाल्यावर करण्यांत आलेला आहे. १९६० च्या मध्याच्या सुमारास अंमलांत यावयाच्या ह्या कार्यक्रमांत १,५०० कोटी रुपये खर्च होतील.

**कारखान्यांतील निरुपयोगी कचरा**— तंबाखू, साखर, कापड, ताग इत्यादींच्या मोठ्या कारखान्यांतून अनेक प्रकारचा निरुपयोगी कचरा फेकून देण्यांत येतो. त्याचा उपयोग करून खाण्याचे पदार्थ, औषधें, खतें, इत्यादि तयार करतां येतील असें प्रयोगांतीं सिद्ध झालें आहे. हें संशोधन कौन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रिअल रिसर्चतर्फे करण्यांत आलें आहे.

**दिवाण-इ-आमची दुरुस्ती**--आग्रा येथील इतिहासप्रसिद्ध किल्ल्यांतील दिवाण-इ-आम हा सभामंडप गळत असल्याचें आढळून आल्यानें त्याची दुरुस्ती करण्यांत येणार आहे. ह्या कामासाठी ६,००० रुपये खर्च येणार आहे. ह्याशिवाय किल्ल्यांतील इतर कांहीं बांधकामाची दुरुस्ती आधींच करण्यांत आली आहे.

**अपघाताविरुद्ध दक्षता**—भिलई येथील पोलादाच्या कारखान्यांत काम करणाऱ्या कामगारांना संभाव्य धोक्याची जाणीव करून देण्यासाठी सोव्हिएट तज्ज्ञांच्या मदतीनें दोन बोलपट तयार करण्यांत आले आहेत. त्याशिवाय ज्वालाग्राही वायूमुळें आगीचा भडका उडाल्यास त्यासंबंधीं सावधानतेचा इषारा देण्याचीहि व्यवस्था करण्यांत आली आहे.

**अणुशक्तीच्या कारखान्याचें स्थान**— अणुशक्तीच्या साह्यानें विजेचें उत्पादन करणारा कारखाना मुंबईजवळ काढण्याचा निर्णय अणुशक्ति मंडळानें घेतला आहे. पण ह्या निर्णयाविरुद्ध गुजरात चेंबर ऑफ कॉमर्सनें तक्रार केली आहे. देशांतील उद्योगधंद्यांच्या विकासाच्या दृष्टीनें अहमदाबादच्या बाबतींतील हक्क मान्य करण्यांत यावा असें चेंबरचें मत आहे.

**घड्याळांचे दोन कारखाने**—परदेशी तंत्रज्ञांच्या मदतीनें भारतांत घड्याळांचे दोन कारखाने काढण्यांत येणार आहेत. त्यांपैकी एक कारखाना कोइमतूरजवळ निघणार असून तो खाजगी मालकीच्या विभागांत राहील. दुसरा कारखाना बंगलोर येथें निघावयाचा असून तो सार्वजनिक मालकीचा राहील.

**नायलॉनच्या कापडाचा कारखाना**— अमेरिकन कंपन्यांचा एक गट भारतांत नायलॉनचें कापड तयार करणारा पहिला कारखाना काढणार आहे. कारखाना मुंबईनजीक निघण्याचा संभव असून त्यांत १० लाख डॉलर्स गुंतविण्याची तयारी गटानें दाखविली आहे. कारखान्याच्या उभारणीसाठी तीन लाख डॉलर्सची यंत्रसामुग्री लागणार आहे. अमेरिकन कंपनीबरोबर एक हिंदी कंपनीहि कारखान्यांत सामील झालेली आहे.

**साखरेचें उत्पादन कमी कां ?**— भारतामधील साखरेच्या टंचाईविषयीं लोकसभेंत बोलतांना अन्नमंत्री श्री. अजितप्रसाद जैन म्हणाले कीं, १९५८-५९ च्या हंगामांत साखरेचें उत्पादन कमी झालें. कारण, उसाचें उत्पादन घटलें. ह्या हंगामांत १९·२ लाख टन साखर तयार झाली. पूर्वीच्या हंगामांतील ३·३१ लाख टन शिल्लक जमेस धरूनहि खपाच्या मानानें साखर कमी पडली. चालू वर्षी २१ लाख टन साखर खपेल असा अंदाज आहे.

**हरिजनांना नौकरी देण्याची सक्ति**— हरिजनांना नौकरी देण्याबाबत पंजाब सरकारनें सक्तीचा आश्रय केला आहे. सरकारी कचेऱ्यांतून सरकारतर्फे अगर खाजगी रीतीनें जीं खाण्यापिण्याचीं दुकानें चालविण्यांत येतात त्यांत हरिजनांनाच नौकरीवर घेण्याचा हुकूम काढण्यांत आला आहे. हरिजनांपासून अन्न घेण्याबद्दल वरिष्ठ वर्गांत जी अनिच्छा दिसते, ती नाहींशी करण्याचा हा प्रयत्न आहे.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★




१५ ऑगस्ट १९५९ रोजीं स्वातंत्र्यदिनाचे सुमुहूर्तावर बँकेची शाखा पुणें विद्यापीठानजिक सुरू झाली आहे.

स्थापना १९३६

## दि युनायटेड वेस्टर्न बँक लि. सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

**हेड ऑफिस :**

पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा शहर.

शाखा—१. मुंबई, फोर्ट, २. मुंबई, गिरगांव, ३ मुंबई, दादर, ४. नासिक, ५. पुणें, ६. बार्शी, ७ लोणंद, ८. कोल्हापूर, ९. हलकर्णी, १०. इचलकरंजी, ११. फलटण.

| | | ३० जून, १९५९ अखेर |
|---|---|---|
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व्ह व इतर फंडस् | रु. | ४,७५,००० |
| ठेवी | रु. | १,६८,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,९५,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याज :

| १ वर्ष ते २ वर्षें | तीन वर्षें | ५ वर्षें | दहा वर्षें |
|---|---|---|---|
| रु. ३·०० | रु. ३·२५ | रु. ३·५० | रु. ४·०० |

रु. एक हजार अगर त्याहून अधिक रकमा अल्प मुदतीनें आकर्षक व्याजाचे दरानें स्वीकारल्या जातात.

दराबाबत चौकशी करावी.

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २·०० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | २·५० |
| चालू डिपॉझिट | दरसाल दर शेंकडा | ०·५० |

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., जन. मॅनेजर.

शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लि., पुणें २.

॥ जय हिंद ॥

## १५ ऑगस्ट

भारतीय स्वातंत्र्यदिनाच्या या मंगल प्रसंगीं आमचे भागीदार, ठेवीदार व हितचिंतक यांना

## अभिवादन व हार्दिक शुभेच्छा

### १९५९–६० चा गळिताचा हंगाम दसऱ्याच्या शुभदिनीं सुरू होईल.

—: संचालक-मंडळ —

श्री. शं. ल. लिमये, B. Sc, LL. B., वकील, अध्यक्ष.

श्री. शं. भ. कोंडे देशमुख, व्यापारी.
श्री. ग. ह. सबनीस.
श्री. रामराम देशमुख, M. A., LL. B., (Cant.) Bar-at-Law, M. P.
श्री. ज. चं. आगाशे.
श्री. भ. ग. भाडुले, B. Sc., LL. B., वकील.
श्री. श्री. र. केसकर, वकील.
श्री. वि. कृ. साठे, B. A. (टिळक), माजी पुरवठामंत्री, मुंबई राज्य.
श्री. गो. न. जोशी, B. Sc.

**श्री. के. व्यं. चांफेकर,** B. E., A. M. I. E., मॅनेजर.

# अर्थ

बुधवार, ता. १९ ऑगस्ट, १९५९





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा गाभा शेती हाच राहणार

### 'एकॉनॉमिस्ट' पत्राचा आढावा

तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत शेतीच्या वाढीवरच भर द्यावा लागेल; कारण -लोकसंख्येच्या वाढीची गति आणि राष्ट्रीय उत्पन्नांतील सुधारणा ह्यामुळें अन्नपुरवठ्यावर अधिकाधिक ताण पडणार आहे, असें मत 'एकॉनॉमिस्ट'नें व्यक्त करतांना खालीलप्रमाणें विवेचन केलें आहे:—

"हिंदी योजनाकारांनीं दरसाल लोकसंख्या १·३% ह्या गतीनें वाढत आहे, म्हणजे प्रतिवर्षी लोकसंख्येंत ५० लाखांची भर पडत आहे, असें गृहीत धरलें होतें. १९४१ व १९५१ ह्या वर्षांच्या शिरगणतींच्या दरम्यानच्या काळांत लोकसंख्या ह्याच गतीनें वाढली. परंतु चाचणीच्या मोजणींवरून, खरी वाढ दरसाल २% किंवा ८० लक्ष एवढी होत आहे, असें आढळून आलें आहे. जननाचें प्रमाण थोडें घटलें आहे, तरी मृत्यूचें प्रमाण खूपच कमी झालें आहे. पहिल्या पंचवार्षिक योजनेंत राष्ट्रीय उत्पन्नांत १८% भर पडली. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेचें लक्ष्य २५% भर आहे; बहुधा २०% भर प्रत्यक्षांत पडेल. तिसऱ्या पंचवार्षिक योजनेंत ३०% भर पडावी अशी भाषा ऐकूं येते. उत्पन्न वाढलें, कीं अन्नाला जास्त मागणी असते, हा भारतांतला अनुभव इतर गरीब देशांतल्या अनुभवास धरूनच आहे. तेव्हां, हातांशीं थोडे पैसे ज्यास्त आले, कीं अन्नधान्यांचा खप वाढतो, दूध जास्त लागूं लागतें आणि द्विदल धान्यांना सुमारें ७०% जास्त मागणी येते. १९५८ मध्यें, अन्न व शेतीचा कच्चा माल ह्याप्रीत्यर्थ भारतानें सुमारें २५० कोटी रुपयांची परदेशी हुंडणावळ खर्च केली!

"हिंदी शेतीचें उत्पादन फारच कमी आहे, तें वाढण्यास खूपच वाव आहे. तें दुप्पट होऊं शकेल, असें फोर्ड फौंडेशनच्या तज्ज्ञांचें मत आहे; परंतु शेतीची पद्धति मात्र त्यासाठी सुधारायला हवी. शेतकऱ्यानें काय करायला हवें, ह्याचें संशोधन व्हायला हवें. त्याच्या क्षेत्राला किती युरिया किंवा पोटॅश ह्यांची जरूरी आहे, हें त्याला सांगितलें पाहिजे. त्याच्या जमिनीला कोणतें सुधारलेलें बी सोईचें आहे, हेंहि त्याला समजावून सांगायला हवें. पेरणी कशी करावी, शेतांतले चढ-उतार कसे व कां दूर करावे, हें सुद्धां समजावून सांगण्याची आवश्यकता आहे. कालव्याचें पाणी किती हवें व त्याचे पाट कसे बांधायचे हेंहि त्याला शिकवलें पाहिजे. यांत्रिक अवजारांच्या वापराचें प्रात्यक्षिक त्याला दाखवायला हवें. शेतकऱ्याला पटवून दिलें, तर पटतें. १९५० मध्यें २,७५,००० टन खतास मागणी होती, ती आतां ५,००,००० टनांवर गेली आहे. आखूड धाग्याऐवजी लांब धाग्याच्या कपाशीची लागवड एकसारखी वाढत आहे. डीझेल पंपांचा पुरवठा मागणीचे मानानें अपुरा पडत आहे. कृत्रिम गर्भधारणेसहि विकास-केंद्रांतून विरोध दिसून येत नाहीं.

"शेतकरी सुधारणा करण्यास तयार आहे, ह्यामुळें सरकारवरील व सहकारी चळवळीवरील जबाबदारी वाढली आहे. त्याला दाखविलेलें प्रात्यक्षिक त्याच्या परिस्थितीला योग्य असेंच असायला हवें. सुधारलेलें बीं अपुऱ्या पावसामुळें नीट रुजलें नाहीं, तरी त्याच्या प्रयोगास तो पुनः तयार होणार नाहीं. दुसरी गोष्ट म्हणजे, शेतकऱ्याला जी गोष्ट पटली असेल ती त्याला प्रत्यक्षांत करतां आली पाहिजे. उदाहरणार्थ, सुधारलेलें बीं जरूरीच्या वेळीं उपलब्धच नसतें, किंवा त्यांत भेसळ आढळते! खत जेवढें आवश्यक आहे तेवढें मिळत नाहीं. मोठ्या धरणांच्या योजनांमुळें शेतीला पाणी उपलब्ध झालें तरी त्याचा वापर कसा करायचा, हें त्याला समजावून सांगितलेलें नसतें. पाण्याचा उपयोग करायचा म्हणजे शेतीची जी तयारी करावी लागते, त्यासाठीं शेतकऱ्यांचेजवळ पैसे नसतात.

"भांडवलाचा अपुरा पुरवठा, ही तर मोठीच अडचण आहे. अजूनहि कर्जाच्या नऊ दशांश रक्कम नातेवाईक, सावकार किंवा जमीनदार ह्यांचिकडूनच घेतली जाते. ह्या मार्गांनीं आतां पूर्वीप्रमाणें कर्जें मिळूं शकत नाहींत. कायद्यास संमत असलेल्या व्याजापेक्षा जास्त व्याज आकारल्याखेरीज सावकाराचें पोट भागत नाहीं आणि जमीनविषयक कायद्यांमुळें जमीनदार नष्ट होत चालले आहेत. त्या सर्वांची जागा घेण्यासाठीं सहकारी चळवळीचा प्रसार करण्यांत येत आहे. १९५७-५८ मध्यें प्राथमिक सहकारी पतपेढ्यांनीं सुमारें १०० कोटी रुपयांचीं कर्जें दिलीं; दहा वर्षांपूर्वीच्या मानानें ही रक्कम सहा पट आहे. नव्या सोसायट्या नोंदण्यास बराच वेळ लागतो. कांहीं सोसायट्यांत दोन किंवा तीन कुटुंबेंहि नसतात. सोसायट्यांचा कारभार इतका थंडा असतो, कीं बीं खरीदण्यासाठीं कर्ज मागितलें तर तें कापणीच्या वेळेपर्यंत हातीं पडतें!

"शेतकऱ्यांना नव्या पद्धतींचा अवलंब करायला लावायचा, तर त्याला किमान किंमतीची खात्री हवी. धान्याच्या किंमतीमधील चढ-उतारामुळें होणारें त्याचें नुकसान टाळण्यासाठी सुमारें ५,००० नवीं कोठारें बांधण्यांत येणार आहेत.' सर्व्हिस को-ऑपरेटिव्हज्‌च्या द्वारां शेतकऱ्यांचा बी-अवजारेंविषयक गरजा भागविण्यांत यावयाच्या आहेत. सहकाराच्या आणखी योजना त्यांतून पार पाडल्या जातील. भांडवलाचा पुरवठाहि वाढविण्यांत येईल; त्याकरितां सरकार सहकारी संस्थांच्या शेअर भांडवलाच्या उभारणीस हातभार लावील आणि रिझर्व्ह बँक सहकारी बँकांना अधिक मुक्तहस्तानें कर्जें देईल. स्वस्त भांडवलाच्या अभावीं, बहुतेक शेतकऱ्यांना विहिरी खणणें, खत खरीदणें, किंवा चांगली किंमत येईपर्यंत धान्य बाजारांत न नेणें ह्या गोष्टी परवडतच नाहींत. सर्व्हिस को-ऑपरेटिव्हज्‌ना राजकीय पातळीवर भर दिला जात आहे; ह्या संस्था कार्यक्षम कशा होणार, उद्याची सहकारी शेती कशी शक्य होणार, शेतकऱ्याचें मन कोण व कसें वळविणार, हे सर्व प्रश्न सुटलेले नाहींत. तथापि, शेतीवर अधिकाधिक भर दिला जात आहे हें निश्चित; तिसऱ्या पंचवार्षिक योजनेचा गाभा शेती हाच राहणें अपरिहार्य आहे."

## कापडाच्या गिरण्यांपुढील संभाव्य संकट

अहमदाबाद येथील कापडाच्या कारखान्यांनीं कापडाच्या धंद्याविषयीं संशोधन करणारी एक संस्था चालविली आहे. कापडाचा खप, त्याचें उत्पादन, आगामी काळांतील कापडाची मागणी, इत्यादि प्रश्नांविषयीं आंकडेवार माहिती जमवून संस्था संशोधन करीत असते. संस्थेच्या आंकडेशास्त्रज्ञांना कापड-गिरण्यांच्या ह्या वर्षींच्या परिस्थितीबद्दलचा अहवाल निरुत्साही करणारा आहे. त्यांच्या मतानें ह्या वर्षी कापडाच्या खपांत बरीच घट होण्याचा संभव आहे. ह्याचें कारण म्हणून त्यांनीं अन्न-धान्याच्या, जळणाच्या व कापडाच्या गिरण्यांना लागणाऱ्या कच्च्या मालाच्या एकसारख्या वाढत जाणाऱ्या किंमतींचा निर्देश केला आहे. ते म्हणतात कीं, गेल्या तीन वर्षांत अहमदाबादच्या व मुंबईच्या गिरण्यांनीं देशांतील एकूण उत्पादनाच्या दोनतृतीयांश कापड उत्पादन केलें. ह्या उत्पादना-पैकी मुंबईहून व अहमदाबादहून बाहेर पाठविण्यांत येणाऱ्या कापडांत ९·८ कोटी वारांची घट झालेली आहे. दुसऱ्या पंच-वार्षिक योजनेच्या अखेरपिर्यंत देशांतून १०० कोटी वार कापड निर्यात करण्याचें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें आहे. परंतु १९५८ च्या किंमती जमेस धरून फक्त ६० कोटी वार कापडच निर्यात होईल असें दिसत आहे. सध्या हातमाग व यंत्रमाग ह्यांच्या कापडाला संरक्षण देण्यांत आलें आहे. त्यामुळें ह्या कापडाची मागणी वाढण्याचा संभव आहे. मध्यप्रदेश व आंध्र हीं राज्यें मुख्यतः शेतीप्रधान आहेत. ह्या राज्यांकडून येणारी कापडाची मागणी बरीच कमी झालेली आहे. आसाम, उत्तर-प्रदेश, पंजाब व केरळ राज्यांतून मुंबई व अहमदाबादच्या कापडाला येणाऱ्या मागणींत सुधारणा झाली आहे. धोतरांच्या बाजारांत गेल्या तीन वर्षांत अहमदाबादच्या गिरण्यांच्या धोतरांचा खप उत्तर भारतांत २ कोटी वारांनीं घसरला आहे. मुंबईच्या धोतरांचा खप मात्र १·८ कोटी वारांनीं वाढला आहे.

---

## आकाशवाणीवर 'पडसाद'

श्री. श्री. वा. काळे ह्यांच्या "पडसाद" मालिकेंतील तिसरी श्रुतिका बुधवार, दि. १९ रोजीं व चवथी श्रुतिका दि. २ सप्टेंबर रोजीं 'गृहिणी' मध्यें ध्वनिक्षेपित होईल.

## प्रॉव्हिडंड फंड देण्यास विलंब झाला, तर सरकारनें व्याज द्यावें

पोस्ट खात्याचे एक पेन्शनर, श्री. नारायण सखाराम लिमये, ह्यांनीं दावा लावून सरकारकडून प्रॉव्हिडंड फंडाच्या येणें रकमेवरील व्याजाच्या २१० रुपयांची मागणी केली होती. त्यांच्या सेवा-निवृत्तीनंतर प्रत्यक्ष रक्कम हातीं येण्यास त्यांना जो काळ लागला त्या काळांतील व्याजाची ही रक्कम होती. विजापूरचे सिव्हिल जज्ज ह्यांनीं श्री. लिमये ह्यांना व्याजाच्या रकमेची डिक्री दिली नाहीं. परंतु त्यांनीं आपल्या निकालपत्रांत सरकारला रूल १४, सबरूल ४, ह्यांत सुधारणा सुचविली आहे. ह्या नियमाप्रमाणें सेवानिवृत्तीनंतर सहा महिन्यांच्या काळाचें व्याज मिळूं शकतें; प्रॉव्हिडंड फंडाची रक्कम त्याला मिळण्यास कितीहि विलंब लागो. प्रॉव्हिडंड फंड देणाऱ्या अधिकाऱ्यांच्या निष्काळजीपणाचा दुष्परिणाम सेवानिवृत्तास भोगावा लागतो. प्रॉव्हिडंड फंडांत ज्यानें पैसे ठेवले, त्याचे पैसे त्याला तात्काळ न देतां, त्यावरील व्याजहि बंद करून तें सरकारनें स्वतः वापरणें समर्थनीय नाहीं, असें सिव्हिल जज्जांनीं म्हटलें आहे.

---

## पुणें जिल्हा सहकारी बोर्ड लि. पुणें.


मुंबई राज्य सहकारी युनियनच्या वतीनें शेतकी पत पुरवठा संस्था व विविध कार्यकारी सहकारी संस्था यांचेकरतां ठेवण्यांत आलेल्या स्पर्धेत पुणें जिल्ह्यांत प्रथम व द्वितीय क्रमांकांची पारितोषिकें मिळविणाऱ्या चाकण व खरपुडी येथील विविध कार्यकारी संस्थांना पारितोषिकें देण्याचा समारंभ नामदार बाळासाहेब भारदे, सहकारमंत्री, मुंबई राज्य यांच्या हस्तें रविवार दि. १६ ऑगस्ट १९५९ या दिवशीं सायंकाळीं ६ वाजतां खेड येथें पार पडला.

---

## ख्रिस्ती मिशनऱ्यांचें एवढें चालतें तरी कसें?

१९५९ च्या पहिल्या चार महिन्यांत भारतांतील ख्रिस्ती मिशनऱ्यांना परदेशांतून ३७० लक्ष रुपये मिळाले. त्यांपैकीं ६८ लक्ष रुपये ग्रेट ब्रिटनमधून आले, २६४ लक्ष रुपये अमेरिकेनें पाठवले, ११·६ लक्ष रुपये कॅनडानें धाडले आणि ७·९ लक्ष रुपये प. जर्मनीकडून आले.

किर्लोस्कर
स्थापना १८८८
पावरवर चालणारा
उंसाचा चरक



कमी वेळेंत जास्तींत जास्त उसाचें गाळप करण्यासाठीं शेतकरी किर्लोस्कर चरकाचीच निवड करतात. रोलर्स. गिअर्स इत्यादी सर्व भाग उत्कृष्ट पोलाद, ओतींव लोखंड व गनमेटल-पासून तयार केलेले असून वर्षानुवर्षें बिनतक्रार काम देण्याच्या दृष्टीनेंच त्यांची रचना केलेली असते. बैलाकडून चालणारेहि चरक तयार होतात.

किर्लोस्कर ब्रदर्स लि.
किर्लोस्करवाडी (द. सातारा)

## लवंगांचीं झाडें

कोंकणांत लवंग, मिरीं, दालचिनी हे मसाल्याचे जिन्नस होऊं शकतात. परंतु अशा प्रकारचें नवें उत्पन्न काढण्याकडे कोकणांतील शेतकऱ्यांचें विशेषसें लक्ष नाहीं. भातशेतीशिवाय अन्य कांहीं नवें उत्पादन काढावें याकडे त्यांचा कल नाहीं. व बऱ्याच वेळां त्यांना अज्ञानामुळें नवीन पिकें येऊं शकतील कीं नाहीं हें माहीतहि नसतें. लवंगांच्या उत्पन्नाला तर पावसाळा आणि कोंकणची हवा ही अत्यंत अनुकूल आहेत.

जेवणामधील पदार्थांना खमंगपणा आणण्यासाठी जो मसाला वापरला जातो त्यांत 'लवंगे' ला महत्त्वाचें स्थान आहे. भारत हें जगांतील दुसऱ्या क्रमांकाचें 'लवंग' वापरणारें राष्ट्र आहे. झांजीबार व अन्य देशांतून लवंगेची सालिना आयात जवळ जवळ ७१,००० हंड्रेडवेटस् असून त्याची किंमत सुमारें वीस लक्ष रुपये होईल.

### पूर्वेतिहास

सुमारें दीडशें वर्षांपूर्वी लवंगेच्या उत्पादनाला भारतामध्यें सुरुवात झाली. दक्षिण भारतामध्यें, त्या काळीं प्रथम ही लागवड सुरू करण्यांत आली होती. पण ती सध्यां दक्षिण भारतांतील पश्चिम किनाऱ्यावरील डोंगराळ भागापुरतीच मर्यादित आहे.

दीडशें वर्षांपासून लवंगांची भारतांत लागवड होऊनहि जेवढ्या झपाट्यानें त्यांच्या उत्पादनाची वाढ व्हावयास पाहिजे तेवढी ती झाली नाहीं. ती ठराविक भागापुरतीच मर्यादित राहिली. इतर देशांतील लवंगांच्या लागवडीलायक जमिनी व भारतांतील लागवडीलायक जमीन यांची जर पहाणी केली तर 'लवंगेचें' उत्पन्न येण्याच्या दृष्टीनें भारतांतील जमीन कोणत्याहि प्रकारें हिणकस नाहीं. 'कल्लार' व 'बरलीआर' या मद्रास राज्याच्या प्रदेशांतील व निलगिरी भागांतल्या कांहीं प्रदेशांतील पिकांची वाढ व हंगाम पहातां या पिकाची निर्यात करण्यास भरपूर वाव आहे.

### लवंगांचीं झाडें

लवंगीचें झाड उंच वाढतें. तें सरळ, त्रिकोणी आकारांत सुमारें ३० ते ४० फुटांपर्यंत विस्तृत फांद्या असें वाढतें. त्याचीं पानें लहान व लांबट असतात. त्यांत तेलग्रंथी असल्यामुळें त्यांना एक प्रकारचा सुवासहि येतो. हीं पानें साधारणपणें चिकूच्या पानांसारखीं दिसतात. पानें तोंडांत घालून चावली असतां त्यांची चव 'लवंगे' प्रमाणें लागते. कांहीं लोक चवीसाठी हीं पानें जेवणांत व मसाल्यांतहि वापरतात.

लवंगेच्या झाडाच्या फांद्यांच्या टोकाला, हिरवट गुलाबी रंगाच्या नखाच्या आकारासारख्या लहान लहान कळ्या झुबक्या झुबक्यांनीं धरतात. ह्या कळ्या अविकसित अवस्थेंत असतांना उमलण्यापूर्वी काढल्या आणि त्या एक आठवडाभर उन्हांत सुकविल्या कीं व्यापारी दृष्टीनें लवंगा तयार होतात. कळ्या न खुडतां त्या जर झाडावर तशाच राहूं दिल्या, तर त्या उमलतात व त्यांचीं फुलें होतात. त्यांना 'लवंगांची जननी' (मदर ऑफ क्लव्ह) असें संबोधण्यांत येतें. अशा लहान, लांबट, व कांहींशा नरम तपकिरी बियांमध्यें या फुलांचें रूपांतर होतें.

### लवंगांना अनुकूल हवामान

लवंगाच्या झाडांचीं पानें, अपक्व फळें, तुटक्या लवंगा व त्यांचे तुरे अति सुवासिक असून त्यापासून सुगंधयुक्त व आरोग्यदायी तेलेंहि बनवितां येतात.

उबदार दमट हवा, कमीत कमी ६० इंचांपर्यंत नियमित पडणारा पाऊस, व ६० ते १०० फॅरनहीट पर्यंतचें उष्णतामान अशा प्रदेशांत लवंगांचें चांगलें उत्पन्न येतें. मात्र फार उष्ण व फार कमी उष्णतामान असलेल्या ठिकाणीं लवंगांचें उत्पन्न येत नाहीं. त्याचबरोबर सुयोग्य हवामान असेल तर तीन हजार फूट उंचीच्या जागींसुद्धां लवंगांच्या झाडांची यशस्वी व फलदायी लागवड होऊं शकेल.

### लवंगांखालील प्रदेश

या गोष्टी विचारांत घेतल्या तर निलगिरीच्या कमी उंचीच्या भागांत, मद्रास मधील 'शेवराय' आणि 'पलानिस' 'काली' व 'जावडी' टेकड्यांचा भाग, आंध्रमधील एजन्सी विभाग, केरळांतील 'वायनाड' व इतर कांहीं भाग, म्हैसूर व ओरिसांतील डोंगराळ रांगांचा विभाग, मध्यप्रदेश आणि आसामांतील डोंगराळ पट्ट्या, हे विभाग ह्या पिकाच्या मोठ्या प्रमाणावर लागवडीच्या दृष्टीनें उपयुक्त आहेत. महाराष्ट्रांतील कांहीं भागांतून हें पीक येऊं शकेल. विशेषतः कोकणांत व त्यांतहि रत्नागिरी जिल्ह्यांत या झाडांची लागवड केल्यास अति फलदायक ठरेल.

### जमीन

लवंगांच्या पिकासाठी विशेषच प्रकारची जमीन पाहिजे असें जरी नसलें तरीं लवंगांच्या लागवडीसाठी जमीन निवडतांना, ती शक्यतों कसदार, भुसभुशीत, नरम, खोलवर माती असलेली आणि थोडासा गारवा असलेली असावी. मात्र पाणी सांचून रहाणारी जमीन या पिकाला चालत नाहीं.

अलिकडे 'बरलीआ' मध्यें लवंगेच्या झाडाला कलम करण्यांत यश मिळालें असलें, तरी अद्याप झाडें बींपासूनच उत्पन्न केलीं जातात.

रोपांची उपज करण्यासाठी जेव्हां पक्व फुलें झाडांपासून खुडलीं जातात, तेव्हां तीं रासेंत चोळून एक दिवस सुकवावीं लागतात. या फुलांतच बारीकशी 'बी' असते. त्यानंतर दुसऱ्या दिवशीं 'वाफा' तयार करून लगेच तीं पेरावीं लागतात. कडक उन्हापासून या वाफ्याचें रक्षण करण्यासाठी त्यावर विरळ शाखारणी करावी लागते.

### रोपांची लागवड

पहिल्या टप्प्यांत या झाडांचीं जीं रोपें येतात, त्यांची वाढ अतिशय मंद असते. हीं रोपें बारा इंच वाढल्यावर त्यांना त्या वाफ्यांतून काढून दुसरीकडे वीस–वीस फुटांच्या अंतरावर लावावींत. अशा प्रकारें एका एकरामध्यें साधारणतः शंभर झाडें लागायला कोणताच प्रत्यवाय नाहीं.

कोवळ्या रोपांना, विशेषतः त्यांच्या मुळांना मृदुत्व असतें. तीं एका ठिकाणाहून काढतांना व नव्या जागीं लावतांना फार काळजी घेतली पाहिजे. रोप काढतांना आजूबाजूच्या मातीच्या गोळ्यासह उचलून काढावें. ज्यांत रोप लावावयाचें असेल असा खड्डा २ फूट × २ फुटांचा असावा व तो खताच्या मिश्रणानें भरावा. रोप एका जागेपासून काढून तें दुसऱ्या जागीं लावलें म्हणजे, उन्हानें तें कोमेजून जाऊं नये म्हणून दाट पानांच्या डहाळ्यांनीं किंवा शाकारणीनें आच्छादायला हवें. कोवळ्या स्थितींतून वाढत असतांना या रोपांचें रक्षण करण्यासाठी केळीं किंवा ग्लेरिसिडिया यांचीं झाडें मधल्या जागेंत लावावींत. मात्र हीं कायम सावलीचीं झाडें लवंगांच्या झाडांच्या अगोदर लावावींत. म्हणजे त्यापासून लवंगांच्या झाडांना वाऱ्याच्या झुळुका तर मिळतीलच, परंतु त्याच बरोबर कोवळ्या लावणीच्या या झाडांची कायमची साहाय्याची गरजहि भागेल.

### लावणी केव्हां करावी ?

लवंगांच्या रोपांची लावणी करण्यास पावसाळी हंगाम हा

उत्तम आहे. मात्र जेव्हां पाऊस नसेल तेव्हां कोंवळें रोप मरून जाऊं नये म्हणून मधून मधून घागरीनें हात–शिंपणेंहि करणें आवश्यक आहे. लवंगांचीं मूळ धरलेलीं झाडें हीं बळकट व कणखरहि असतात. पूर्णपणें वाढलेल्या व उत्पन्न देणाऱ्या झाडांना क्वचितच पाणी द्यावें लागतें.

सुपीक जमिनींत सताची जरूरी भासत नाहीं. कोंवळ्या रोपाला एका वर्षामध्यें साधारणतः ५० ते १०० पौंड चांगलें कुजलेलें शेणखत व दोन तीन औंसांप्रमाणें प्रत्येक रोपाला सल्फेट ऑफ अमोनिया दिल्यास त्यांची जोमदारपणें वाढ होण्यास मदत होते. कुजलेला पाला व कुजलेलें शेणखत हें लवंगांच्या झाडांना चांगलें मानवतें.

या झाडांच्या फांद्यांची प्रवृत्ति दाटी करण्याकडे असल्यामुळें पीक काढण्यास सोपें जावें व त्याची वाढ आटोपशीर व्हावी एवढ्यासाठी फांद्या छाटून विरळ करणें बरें असतें. परंतु अशी छाटणी करण्याची जरूरीच आहे असें मात्र नाहीं. रोगट कोंब, मेलेल्या फांद्या, या दृष्टोपत्तीस येतांच काढून टाकाव्यात.

बहर

जेव्हां झाडांना बहर येतो तेव्हां त्यांच्याकडे मेहनतपूर्वक विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. लवंगाच्या बीपासून तयार झालेलीं रोपें साधारणतः सातव्या वर्षापासून उत्पन्न देऊं लागतात व हें उत्पन्न क्रमाक्रमानें वाढत जाऊन शेवटपर्यंत अशा प्रकारचें उत्पन्न मिळतें. झाडाच्या आयुर्मर्यादेचें प्रमाण कमीत कमी ६० वर्षेपर्यंत आहे.

लवंगेच्या झाडापासून ६ ते १० पौंडांपेक्षाहि जास्त लवंग मिळूं शकते. आज बाजारांत लवंगेच्या एका पौंडाची कमीत कमी किंमत ९ रु. आहे. म्हणजे एका झाडापासून ६० ते १०० रु. पर्यंत कमीत कमी उत्पन्न सहज मिळूं शकतें.

लवंगेच्या झाडाला येणारीं फुलें वा कळ्या म्हणजेच लवंगा होत. कांहीं जणांना ही गोष्ट माहीत नसते; ते झाडाला कळ्या येऊन त्यांचीं फुलें झालीं व तीं गळून पडलीं तरी झाडाला लवंग अजून कशी धरली नाहीं याच्याच विचारांत असतात. फुलण्या-पूर्वी हिरवट गुलाबी कळ्यांचे घोस काढून ते उन्हांत सात दिवस सुकविले कीं ' लवंगा ' तयार होतात. मात्र ह्या सुकायला ठेवलेल्या कळ्या रात्रीच्या वेळीं दंवबिंदूंत किंवा पावसांत ठेवूं नयेत. कांहीं देशांनीं लवंगा विशेष तऱ्हेनें सुकवून त्यांच्या विविध जातीहि निर्माण केल्या आहेत.

### साखरेचा पुरवठा आणि खप
( आंकडे लक्ष टनांचे )

| | १९५४–५५ | १९५५–५६ | १९५६–५७ | १९५७–५८ | १९५८–५९ | १९५९–६० (अंदाज) |
|---|---|---|---|---|---|---|
| प्रारंभींची शिल्लक | १·१३ | ५·४४ | ५·३६ | ४·२८ | ३·२९ | ०·९० |
| उत्पादन | १५·८९ | १८·६२ | २०·२६ | १९·७६ | १९·०४ | २१·०० |
| आयात | ५·६५ | ०·६८ | ... | ... | ... | ... |
| निर्गत | ... | ... | १·६४ | ०·३१ | ०·१९ | |
| एकूण पुरवठा | २२·६७ | २४·७४ | २३·९८ | २३·७३ | २२·१४ | २१·९० |
| खप | १७·२३ | १९·३८ | १९·७० | २०·४४ | २१·२५ | २२·०० |
| शिल्लक | ५·४४ | ५·३६ | ४·२८ | ३·२९ | ०·८९ | –०·१० |

### उसाचें उत्पादन व क्षेत्र

| ऊंस | १९५४–५५ | १९५५–५६ | १९५६–५७ | १९५७–५८ | १९५८–५९ |
|---|---|---|---|---|---|
| उत्पादन एकर | १४·५५ | १२·९९ | १३·२२ | १२·७३ | — |
| उसाखालील लागवड (लक्ष एकर) | ३९·९४ | ४५·६४ | ५०·५७ | ५०·२१ | ४८·९६ |

### साखरेच्या किंमतीची छाननी
(१९५७–५८ विषयक, १२४ दिवसांचा सीझन, ९·३३% उतारा)

| | रु. | % |
|---|---|---|
| उसाची किंमत (४० रु. दरानें) | १४·५५ | ४०·४२ |
| कर | १३·१४ | ३६·५० |
| उत्पादन खर्च | ६·३४ | १७·६१ |
| दुरुस्त्या, फेरउभारणी | ०·५० | १·३९ |
| निर्गतीमधील तोटा | ०·५० | १·३९ |
| नफा | ०·९७ | २·६९ |
| एकूण रु. | ३६·०० | १००·०० |

### साखरेवरील एक्साईज पट्टी

| | प्रत्येक हंड्रेड्वेटास | प्रत्येक मणास | १–११–५३ चे मानानें वाढ |
|---|---|---|---|
| १–११–५३ | ३·७५ | २·७५ | |
| १—५–५५ | ५·६२ | ४·१४ | ५% |
| १६—५–५७ | ११·२५ | ८·२५ | २००% |
| १४–१२–५७ | ११·२५ अधिक ३·३१* | ८·२५ अधिक २·४४* | २८८% |

* सेल्स टॅक्सच्या जागीं जादा एक्साईज पट्टी.

### खंडसारीवरील एक्साईज पट्टी

| | मूळ पट्टी | जादा पट्टी |
|---|---|---|
| १–३–१९५६ पूर्वी | ० | ० |
| १–३–१९५९ नंतर सल्फिटेशन प्लँट असेल, त्या ठिकाणीं | ५·०४ प्रत्येक हंड्रेड्वेटास | ०·६३ प्रत्येक हंड्रेडवेटास |
| इतर ठिकाणीं | ३·९२ प्रत्येक हंड्रेड्वेटास | ०·४९ प्रत्येक हंड्रेडवेटास |

## स्थानिक संस्थांच्या रकमा सहकारी बँकांमध्यें ठेवण्यास परवानगी

नगरपालिका, जिल्हा स्कूलबोर्ड्स, जिल्हा लोकलबोर्ड्स, जिल्हा बांधकाम-समित्या, वगैरे सारख्या स्थानिक संस्थांना त्यांचा जादा निधि कांहीं विशिष्ट अटींवर फक्त अ व ब वर्गांच्या सहकारी बँकांमध्यें ठेवण्यास मुंबई सरकारनें परवानगी दिली आहे.

सेंट्रल सहकारी बँकांना भरपाई झालेलें शेअर भांडवल आणि कायद्यानें ठेवावयाची शिल्लक उणे प्रत्यक्ष नुकसान यांच्या ५ पटींपर्यंत रक्कम स्वीकारतां येईल. कोणत्याहि सेंट्रल बँकेस अशा रकमा, तिच्या अन्य साधनांद्वारें मिळालेल्या एकूण रकमेच्या ४० पटीहून अधिक, एवढ्या प्रमाणांत स्वीकारतां येणार नाहीं. तसेंच कुठल्याहि प्रसंगीं, कोणत्याहि एका स्थानिक संस्थेच्या ठेवींची रक्कम ही, दिलेल्या कोणत्याहि मुदतींत, एकूण ठेवींच्या १५ टक्क्यांहून अधिक होता कामा नये. त्याचप्रमाणें, इतर ठेवीदारांकडून मिळालेल्या एकूण ठेवींच्या २५ टक्क्यांपेक्षा अधिक इतकी रक्कम स्थानिक संस्थांच्या ठेवींतून बँकांना स्वतःच्या नेहमींच्या व्यवहारासाठी वापरतां येणार नाहीं आणि ही रक्कम त्यांना गव्हर्मेंट सिक्युरिटीजमध्यें अथवा मुंबई राज्य सहकारी बँक लिमिटेडसारख्या सर्वोच्च संस्थेंत ठेवावी लागेल.

### स्थानिक संस्थांचा निधि

शहर विभागांतील ज्या बँकांजवळ ५०,००० रु. किंवा त्याहून अधिक रुपये रकमेचें भरणा केलेलें भाग भांडवल असेल व ज्या बँका पांच वर्षांपासून काम करीत असतील अशा बँकांना स्थानिक संस्थांकडून भरणा केलेलें भाग भांडवल व कायद्यानें ठेवावयाची शिल्लक उणे प्रत्यक्ष नुकसान यांच्या तिपटीपर्यंत ठेवी स्वीकारण्याची परवानगी आहे. शहरांतील कोणतीहि बँक ही अन्य साधनांद्वारें मिळालेल्या एकूण ठेवींच्या ४० टक्के रकमेहून अधिक ठेवी स्वीकारूं शकणार नाहीं व कोणत्याहि एका स्थानिक संस्थेच्या ठेवींची रक्कम विशिष्ट मुदतींत एकूण ठेवींच्या रकमेच्या १० टक्क्यांहून अधिक असतां कामा नये.

तसेंच या बँका, इतरांकडून मिळालेल्या एकूण ठेवींच्या २० टक्के रकमेहून अधिक रक्कम दैनंदिन व्यवहारासाठी वापरूं शकणार नाहींत व ती रक्कम त्यांना सरकारी रोखे किंवा मुंबई राज्य सहकारी बँक लिमिटेड येथें ठेवावी लागेल.

सहकारी बँकेंत जास्तीच्या रकमा ठेवण्याचा निर्णय स्थानिक संस्थेनें घेण्यापूर्वी, ती बँक वर निर्दिष्ट केलेल्या सर्व अटी पूर्ण करते याविषयीं स्थानिक संस्थेनें खात्री करून घेतली पाहिजे.

---

### ब्रिटिश विमानांचें सर्वोत्तम ग्राहक

जानेवारी ते जून, १९५९ या सहा महिन्यांत भारतानें ब्रिटनकडून ९२,५१,३०८ पौंड किंमतीचीं विमानें आणि वैमानिक साहित्य खरेदी केलें. भारत हें ब्रिटनचें या क्षेत्रांतील सर्वश्रेष्ठ ग्राहक आहे. या काळांत ब्रिटनचें दुसऱ्या नंबरचें व भारताच्या निम्मे किंमतीचें विमान-साहित्य घेणारें गिऱ्हाईक म्हणजे प. जर्मनी होय.

जानेवारी ते जून, १९५९ या सहा महिन्यांत ब्रिटननें ८,७८,०४,७७६ पौंड किंमतीचीं विमानें व साहित्य निर्यात करून नवा विक्रम प्रस्थापित केला.

---

### लायसेन्स असलेले सावकार

जुन्या मुंबई राज्याच्या हद्दींत परवाना धारण करणारे १२,२३७ सावकार आहेत; मराठवाड्यांत १,२५२ आणि विदर्भांत ७,२९१ आहेत.

**वेतनवाढ झाली, पण!**—पंजाब सरकारच्या नोकरींत असलेल्या झाडूवाल्यांच्या वेतनांत दरमहा २ रुपयांची वाढ करण्यांत आली आहे. मात्र ही वाढ त्यांना रोख मिळणार नाहीं. वाढलेल्या वेतनाचे दोन रुपये व पदरचा एक रुपया असे मिळून दरमहा तीन रुपये त्यांनीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकेटांत गुंतविले तरच त्यांना ही वाढ मिळणार आहे. सरकारकडे २,८०० झाडूवाले काम करीत आहेत.

**सौराष्ट्रांत महारोगाची वृद्धि**—सौराष्ट्रांत महारोगाचा प्रसार होत आहे अशी वार्ता आहे. मुंबई सरकार ह्या रोगाच्या प्रसाराबाबत लवकरच एक तपशीलवार पहाणी करणार आहे. रोगाच्या प्रसाराबाबत संशोधनाला सुरवात झाली आहे. पोरबंदर, मानवदार व जुनागढ भागांत संशोधकांच्या एका तुकडीनें आपलें काम चालू केलें आहे.

**ब्रह्मपुत्रेला लगाम घालण्यासाठीं**—पूर्व पाकिस्तानांतून वहाणाऱ्या ब्रह्मपुत्रा नदीच्या पुरावर नियंत्रण ठेवण्याची एक योजना पाकिस्तानच्या एंजिनिअरांनीं तयार केली आहे. ब्रह्मपुत्रा नदीचें कांहीं पाणी नदीच्या पूर्वीच्या परंतु आतां कोरड्या असलेल्या पात्रांत सोडण्याची व्यवस्था करण्यांत येणार आहे. त्यामुळें २० लाख एकर जमिनीला पाणी मिळेल व एक लाख किलोवॅट वीजहि तयार होईल.

**चहाच्या मळ्यांसाठीं वेज-बोर्ड**—भारतामधील चहाच्या मळ्यांत काम करणाऱ्या कामगारांच्या वेतनश्रेणीचा विचार करण्यासाठीं मध्यवर्ती सरकार वेज-बोर्डांची निर्मिति करणार आहे. ह्या दिशेनें पहिलें पाऊल म्हणून आसाम व पश्चिम बंगाल राज्यांसाठीं असें बोर्ड स्थापन करण्यांत येत आहे. चहाच्या उत्पादनांत हीं दोन राज्यें अग्रेसर आहेत.

**मध्यप्रदेशांतील दारूबंदी**—मध्यप्रदेश सरकारनें सर्व राज्यांत तिसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीपर्यंत दारूबंदी अंमलांत आणण्याचें ठरविलें आहे. सध्यां मध्यप्रांतांत मादक पदार्थांच्या विक्रीमुळें राज्याला ४ कोटी रुपयांचें उत्पन्न होतें. परंतु संपूर्ण दारूबंदी सुरू झाल्यावर राज्याचें दरसाल ५ कोटी रुपयांचें उत्पन्न बुडेल. १९६१ सालीं प्रारंभ म्हणून गांजा व भांग ह्यांच्या सेवनास बंदी करण्यांत येणार आहे.

**रशिआंतील सरासरी आयुर्मान**—सोव्हिएट रशिआंत १०० वर्षे पूर्ण केलेलीं २९,००० माणसें आहेत. रशिआंतील नागरिकांचें सरासरी आयुर्मान ६९ वर्षांचें आहे. अमेरिकेंतील आयुर्मानाची सरासरी ७० वर्षांची आहे. त्या खालोखाल कॅनडा, बेल्जम, आस्ट्रिआ, इत्यादि देशांचे क्रमांक आहेत. पाकिस्तानांतील सरासरी ३०–३१ वर्षे आहे.

**नव्या बोटींची खरेदी**—दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या काळांत आतांपर्यंत १४ बोटी भारताची सागरी वहातूक करण्यासाठीं मिळविण्याची तरतूद करण्यांत आली आहे. त्यांपैकी कांहीं बोटी ताब्यांत मिळाल्या असून कांहींचें बांधकाम चालूं आहे. १४ बोटींपैकी दोन बोटी तेलाची वहातूक करणाऱ्या आहेत. आणखी कांहीं बोटींबद्दल परदेशी कंपन्यांशीं बोलणीं चालू आहेत.

**विजेवर चालणारीं रेल्वे एंजिनें**—विजेवर चालणारीं रेल्वे-एंजिनें तयार करण्यासाठीं परदेशांतील कारखान्यांकडून तांत्रिक सहकार्य मिळविण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. प्रथम अशा प्रकारचीं एंजिनें चित्तरंजन येथें फक्त जुळविण्यांत येतील व नंतर हळूहळू यांत्रिक भाग कारखान्यांत तयार करून फक्त विजेचे सुटे भाग परदेशांतून मागविण्यांत येणार आहेत.

## दि पूना मर्चंट्स को. बँक लि.

[ चेअरमन : रामचंद्र गणपतराव टोसर.
एजंट : भगवान गणेश सावणे, बी. कॉम. ]

१,१६७ सभासद; १,५१,१४० रु. वसूल भांडवल, ५,०१,६२५ रु. ठेवी; थकबाकीचें एकूण कर्जाशीं प्रमाण १०·६२% (बुडीत व संशयित कर्जनिवारणफंडाची तरतूद वगळल्यास ५·१७%); रिझर्व्ह फंड ५७,५१० रु.; इतर फंड्स ९८,५४३ रु., कर्जें ६,०१,६५२ रु., नफा १०,७७६ रु., असे ह्या बँकेच्या ३० जून, १९५९ रोजींच्या ताळेबंदांतील प्रमुख आंकडे आहेत. ३% डिव्हिडंडसाठी ४,५५० रु. लागतील.

"समाजवादी समाजरचना या घोषणेनंतरचीं सरकारीं पावलें पुढें पडत चाललीं असून या अर्थवादामध्यें जीवन कायद्याच्या सर्वंकष चाकोरींत बसवितांना व्यापारी व धंदेवाईक यांच्यावर जे जे निर्बंध लादले जात आहेत त्यामुळें हा वर्ग अत्यंत हवालदील झाल्याचें सामान्येंकरून दिसतें. आपल्या कार्यक्षेत्रांतील धंद्याची परिस्थिति पाहिली तर ती या नियमनानें अधिक जाचक झाल्याचें आढळतें. या वर्गातील आपल्या बँकेचे सभासद बहुशः असल्यानें त्यांचेबद्दल सहानुभूति व्यक्त करणेवांचून आज अन्य दिलासा देणें कठीण आहे. तरीहि त्यांचे व्यवहार जिकीरीचे झाले असतां बँकेला जें सहकार्य लाभलें त्याबद्दल" त्यांचे बोर्डानें आभार मानले आहेत.

---

### भारतामधून होणारी अभ्रकाची निर्यात

ऑल इंडिआ मायका कन्व्हेन्शनची बैठक नुकतीच भरली होती. अध्यक्षस्थानीं मायका एक्स्पोर्ट प्रमोशन कौन्सिलचे अध्यक्ष श्री. एस. के. सेन हे होते. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. सेन म्हणाले कीं, जगाच्या अभ्रकाच्या गरजेपैकी ८१ टक्के गरज भारताकडून भागविण्यांत येते. गेल्या वर्षीं भारतानें १० कोटी रुपये किंमतीच्या अभ्रकाची निर्यात केली. अभ्रकाच्या पुरवठ्याच्या बाबतींत भारताची जवळ जवळ मक्तेदारीच आहे असें म्हटलें तरी चालेल. तरीसुद्धां अभ्रकाची योग्य किंमत देण्यांत येत नाहीं हें लक्षांत ठेवलें पाहिजे. अभ्रकाची निर्यात करणाऱ्यांनीं कमी किंमतीला माल देण्याची स्पर्धा थांबविली पाहिजे. अभ्रकाचें उत्पादन व त्याचें वितरण ह्या दोन्हींवर कोणत्या गोष्टींचा परिणाम होतो तें अजमावण्यासाठी सर्व देशाची विस्तृत प्रमाणावर पहाणी करण्याचें काम सध्यां चालू आहे. अलीकडे सोव्हिएट रशिआनें भारताच्या अभ्रकासाठी मोठ्या प्रमाणावर मागण्या नोंदविल्या आहेत. ह्या प्रसंगीं हजर असलेले मध्यवर्ती सरकारचे व्यापारमंत्री श्री. कानुगो ह्यांनीं आपण अध्यक्षांच्या विचारांशीं सहमत असल्याचें सांगितलें. ते पुढें म्हणाले कीं, अभ्रकाच्या बाजारपेठेची सध्यांची परिस्थिति पहातां निर्यात व्यापार हा परदेशी गिऱ्हाइकांच्या मर्जीवर अवलंबून आहे. अभ्रकाच्या बाबतींत भारतांत म्हणण्यासारखें संशोधन अद्यापपर्यंत झालेलें नाहीं. परदेशांत अभ्रकाऐवजीं काय वापरतां येईल ह्यासंबंधीं संशोधन करण्यांत येत आहे. तेव्हां नैसर्गिक अभ्रकच त्याऐवजीं वापरण्यांत येणाऱ्या वस्तूंपेक्षा श्रेष्ठ आहे हें परदेशी गिऱ्हाइकांना पटवून देण्यांत आलें पाहिजे. त्याचप्रमाणें अभ्रकाचे आणखी नवे उपयोगहि शोधून काढण्यांत आले पाहिजेत. अभ्रकाच्या निर्यातीचें अधिक मोठें उद्दिष्ट ठरविण्यांत आलें पाहिजे; म्हणजे ते गांठण्याचे प्रयत्न करतां येतील.


नेहमींच प्रगतिपर व सुरक्षित

## दि बेळगांव बँक लिमिटेड

बेळगांव
( शेड्यूल्ड बँक )
स्थापना १९३०

★ नियमित बचत केल्यानें कुटुंबाची व राष्ट्राची शक्ति वाढीस लागते.

★ कुटुंबांतील मंगलकार्यें, उच्चशिक्षण किंवा घरबांधणी हीं मोठ्या खर्चाचीं कामें पार पाडण्यासाठी नियमित बचत करणें अगत्याचें ठरतें.

★ बेळगांव बँकेंत क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटचें वा होमसेव्हिंगजचें खातें उघडून आपणांस ही तरतूद योग्य रीतीनें करतां येतें.

व्याजाचे आकर्षक दर.

आपल्या सव्वीस शाखांतून सेवावृत्तीनें व्यापार व बचत यांची नेहमींच वाढ करीत असलेली

दि बेळगांव बँक लिमिटेड.

एच्. एस्. कुलकर्णी
जनरल मॅनेजर

## भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

मुख्य कचेरीः—भोर, जि. पुणें.
शाखाः—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ९१,००० |

बोर्ड ऑफ डायरेक्टर्स

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष.
न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले.
श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी
श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी–विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष-चौकशी करावी.

पुणें कचेरीः—बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबाजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय्. एस्. जोशी
मॅनेजर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.